**ठळक बातम्या**

- उच्च शिक्षण संस्थांमधल्या विद्यार्थ्यांच्या आत्महत्या रोखण्याकरता त्यांच्या मानसिक आरोग्याचे प्रश्न सोडवण्यासाठी राष्ट्रीय कृती दल स्थापन करण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश
- महात्मा जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांना भारतरत्न देण्याची शिफारस करण्याचा ठराव महाराष्ट्र विधिमंडळात एकमतानं मंजूर
- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबद्दलच्या टिप्पणीप्रकरणी कुणाल कामराविरोधात एफआयआर दाखल/ तोडफोड प्रकरणी ११ जणांना अटक
- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज विशाखापट्टणम इथं दिल्ली कॅपिटल्स आणि लखनौ सुपर जायंट्स यांच्यात सामना सुरु, नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा दिल्ली कॅपिटल्सचा निर्णय

**आणि**

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे १ हजार ७९ अंकांची वाढ

**<><><><><>**

देशातल्या उच्च शिक्षण संस्थांमधल्या विद्यार्थ्यांच्या वाढत्या आत्महत्या रोखण्याकरता त्यांच्या मानसिक आरोग्याकडे लक्ष पुरवण्यासाठी राष्ट्रीय कृती दलाची स्थापना करण्याचे निर्देश आज सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. आय आय टी  दिल्लीच्या दोन विद्यार्थ्यांनी कथित मानसिक छळाला कंटाळून आत्महत्या केल्याच्या घटनेनंतर त्यांच्या पालकांनी दाखल

केलेल्या याचिकेच्या सुनावणी दरम्यान सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने हे निर्देश दिले. सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश न्यायमूर्ती एस रवींद्र भट यांच्या अध्यक्षतेखाली या कृती दलाची स्थापना होणार असून त्यात ९ इतर सदस्यांचा समावेश असेल. या कृती दलाने देशभरातल्या शिक्षण संस्थांना भेटी देऊन येत्या चार महिन्यांत अंतरिम अहवाल सादर करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत.

शैक्षणिक संस्थांमध्ये आत्महत्या किंवा तत्सम अप्रिय घटना घडल्यास संस्थेने तात्काळ एफ आय आर नोंदवणं गरजेचं असल्याचं न्यायालयाने म्हटलं आहे. जातीवरून भेदभाव, रॅगिंग आणि अभ्यासाच्या अतिरिक्त ताणामुळे होणाऱ्या विद्यार्थी आत्महत्यांच्या घटनांची नोंद घेऊन न्यायालयाने विद्यापीठांच्या भूमिकेबद्दल प्रश्नचिन्ह उपस्थित केलं. विद्यापीठं ही फक्त ज्ञानदानाची केंद्रं नसून विद्यार्थ्यांचं मानसिक आरोग्य आणि सर्वांगीण प्रगतीसाठीही ती जबाबदार आहेत असं न्यायालयाने म्हटलं आहे.

**<><><><><>**

कर्नाटकात सरकारी कंत्राटांमधे मुस्लिमांसाठी आरक्षण ठेवल्याच्या तसंच या आरक्षणासंदर्भात संविधानात बदल करण्याविषयी कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी के शिवकुमार यांनी केलेल्या टिप्पणीच्या मुद्द्यावर संसदेच्या दोन्ही सभागृहांमधे आज गदारोळ झाला. गोंधळामुळे राज्यसभेचं कामकाज दिवसभरासाठी, तर लोकसभेचं कामकाज दोन वेळा तहकूब करावं लागलं.

राज्यसभेत कामकाज सुरु होताच सत्ताधारी भाजपा सदस्यांनी या मुद्यावरुन घोषणा द्यायला सुरुवात केली. संसदीय कार्य मंत्री किरेन रिजिजू यांनी हा मुद्दा उपस्थित केला. एका विशिष्ट अल्पसंख्य समाजासाठी संविधानातल्या

तरतुदी बदलण्याची भाषा करुन काँग्रेसनं संविधानाचा अपमान केला असल्याचा आरोप त्यांनी केला, तसंच डी के शिवकुमार यांच्या राजीनाम्याची मागणी केली. सभागृह नेते जगतप्रकाश नड्डा यांनीही काँग्रेस संविधानाचं महत्त्व कमी करत असल्याचा आरोप केला. तर, भाजपाच संविधानाला कमी लेखत असल्याचा आरोप विरोधी पक्ष नेते मल्लिकार्जुन खरगे यांनी त्यांनी केला. आरोप प्रत्यारोप तसंच घोषणा – प्रतिघोषणा चालूच राहिल्या. त्यामुळे आधी दोन वेळा कामकाज तहकूब झालं. त्यानंतरही घोषणा युद्ध चालूच होतं. या गदारोळातच खनिजतेल विहीरी नियमन आणि विकास सुधारणा विधेयकात लोकसभेनं केलेल्या सुधारणा मंजूर झाल्या. नंतर कामकाज दिवसभरासाठी तहकूब झालं.

लोकसभेतही सत्ताधारी भाजपाच्या सदस्यांनी याच मुद्यावरुन घोषणा दिल्या. उत्तर प्रदेशात महिलांवर अत्याचाराविरोधातल्या घोषणा लिहीलेले फलक घेऊन समाजवादी पार्टीच्या काही सदस्यांनी सभागृहात प्रवेश केला. सभापती ओम बिरला यांनी त्याला हरकत घेतली. सदस्यांनी सभागृहाच्या नियमांचं आणि सभ्यतेच्या संकेतांचं पालन करावं असं त्यांनी सांगितलं. मात्र सपा सदस्यांनी घोषणा चालूच ठेवल्या. दरम्यान भाजपाचे खासदारही घोषणा देत होते. गदारोळामुळे सभापतींनी प्रश्नोत्तराचा तास रद्द केला आणि कामकाज तहकूब केलं.

लोकसभेत आज वित्तविधेयकावर चर्चा सुरु झाली. काँग्रेसचे शशी थरूर यांनी चर्चेचा प्रारंभ केला. वस्तू आणि सेवा कर प्रणालीत अनेक त्रुटी असल्याचं ते म्हणाले. ऑनलाईन गेमिंगवर २८ टक्के जीएसटी

आकारल्यामुळे त्यांना चाप बसेल असं भाजपाचे निशिकांत दुबे म्हणाले. समाजवादी पार्टीचे नीरज मौर्य यांनीही चर्चेत भाग घेतला.

**<><><><><>**

केंद्र सरकारनं संसद सदस्या आणि माजी खासदारांचे वेतन, दैनिक भत्ता आणि पेन्शनमध्ये वाढ केली आहे. यामुळं संसद सदस्यांचे मासिक वेतन एक लाख रुपयांवरून एक लाख २४ हजार रुपये, दैनिक भत्ता दोन हजार रुपयांवरून अडीच हजार रुपये, आणि मासिक पेन्शन २५ हजार रुपयांवरून ३१ हजार रुपये झालं आहे. ही वाढ १ एप्रिल २०२३ पासून लागू होईल.

**<><><><><>**

क्रांतीसुर्य महात्मा जोतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना भारतरत्न देण्याची शिफारस केंद्रशासनाकडे करण्याचा ठराव आज महाराष्ट्र विधानसभेत एकमतानं मंजूर झाला. राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी हा ठराव मांडला होता.

विधानपरिषदेतही हा ठराव एकमतानं मंजूर झाला.

**<><><><><>**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबद्दल कथितरीत्या अपमानजनक टिप्पणी केल्याप्रकरणी मुंबई पोलिसांनी स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामरा याच्याविरोधात एफआयआर दाखल केला आहे. तसंच या कार्यक्रमाचं चित्रीकरण ज्या स्टुडिओत झालं, त्या स्टुडिओची आणि हा स्टुडिओ असलेल्या हॉटेलची तोडफोड करणाऱ्या ४० शिवसेना कार्यकर्त्यांविरुद्धही

पोलिसांनी तक्रार नोंदवून घेतली आहे. शिवसेना कार्यकर्ता राहुल कनाल सह ११ जणांना पोलिसांनी तोडफोड प्रकरणी अटक केली आहे.

**<><><><><>**

कुणाल कामरा विरोधात कठोरात कठोर कारवाई करण्याचे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज विधानसभेत दिलं. संविधानानं प्रत्येकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिलं असलं तरी यातून दुसऱ्याला अपमानित करण्याचा अधिकार कोणालाही नाही, असं ते म्हणाले….

**होल्ड- बाईट - देवेंद्र फडनवीस**

तर, कुणाल कामरा यानं जनभावना व्यक्त केली असल्याचं मत माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे बातमीदारांशी बोलताना व्यक्त केलं…

**होल्ड - उद्धव ठाकरे (२४ सेकंद)**

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज विशाखापट्टणम इथं दिल्ली कॅपिटल्स आणि लखनौ सुपर जायंट्स यांच्यात सामना सुरु आहे. दिल्ली कॅपिटल्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा लखनौ सुपर जायंट्सच्या ८ षटकात १ बाद ९८ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

नवी दिल्लीत जवाहरलाल नेहरू स्टेडियमवर सुरू असलेल्या खेलो इंडिया पॅरा गेम्समधे आज पाचव्या दिवशी पॉवरलिफ्टर्स आणि नेमबाजांनी उल्लेखनीय कामगिरी केली. सुमन देवींनी ५५ किलो वजनी गटात

सुवर्णपदक पटकावलं असून पुरूष ५९ किलो वजनी गटात गुलफाम अहमदने सुवर्णपदक सीमा राणीने ६१ किलो वजनी गटात सुवर्णपदक ,जॉबी मॅथ्यूने ६५ किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावलं असून नेमबाज निहाल सिंगने  मिश्र २५ मीटर पिस्तूल एसएच१ प्रकारात सुवर्णपदक पटकावलं.

**<><><><><>**

देशातल्या शेअर बाजारात गेल्या आठवडाभरापासून सुरू असलेली तेजी या आठवड्याच्या पहिल्या दिवशीही कायम राहिली. मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स आज १ हजार ७९ अंकांची तेजी नोंदवून ७७ हजार ९८४ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही ३०८ अंकांची वाढ नोंदवत २३ हजार ६५८ अंकांवर स्थिरावला.

सत्रादरम्यान सेन्सेक्सनं ७८ हजाराची, तर निफ्टीनं २३ हजार ७०० ची पातळी ओलांडली होती. बँकांच्या समभागांमध्ये आज जोरदार वाढ दिसून आली.

**<><><><><>**

मुंबईत येत्या १ ते ४ मे दरम्यान होणाऱ्या वेव्ज या शिखर परिषदेच्या निमित्ताने वेव्ज बाजार हा कायमस्वरूपी ऑनलाईन मंच सुरु करण्यात येणार असून देशातल्या आशय निर्मात्यांसाठी जागतिक स्तरावर आदानप्रदान करण सोपं होणार आहे.

क्रिएट इन इंडिया उपक्रमाचा भाग असणाऱ्या वेव्ह्ज २०२५ अंतर्गत उद्या नागपूरमध्ये वेव्हज ॲनिमे आणि मँगा अर्थात व्हॅम स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे.

**//<><><><><>//**